# द बिशप्स को-एड स्कूल, उंड्री

## आंतरसदनीय मराठी वक्तृत्व स्पर्धा २०२३-२४

### इयत्ता ६ वी, ७ वी, ८ वी आणि ९ वी

## अहवाल

दिनांक १३ एप्रिल २०२३ रोजी इयत्ता ६ वी, ७ वी, ८ वी आणि ९ वी साठी आंतरसदनीय मराठी वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमाला शाळेचे प्राचार्य श्री. ज्युलियन ल्यूक, मुख्याध्यापक श्री. राल्फ रसल, वरिष्ठ शाळेच्या समन्वयिका श्रीमती कुरियन आणि माध्यमिक शाळेच्या समन्वयिका सौ. खंडेलवाल हे सर्व उपस्थित होते.

सौ. सायली कात्रे यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले आणि त्यानंतर सौ. खंडेलवाल यांनी परमेश्वराची प्रार्थना केली. मनुश्री मुथा इयत्ता ७ वी या विद्यार्थिनीने स्वागतपर भाषणाने कार्यक्रमाला सुरुवात केली. सिद्धी टिभे इयत्ता ८ वी, अनुष्का भोसले इयत्ता 9 वी या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

वक्तृत्व स्पर्धेचे मूल्यमापन करण्यासाठी आमंत्रित केलेले परीक्षक :

**प्रथम परीक्षक : सौ. सविता सुभाष बोराटे**



**सौ. सविता सुभाष बोराटे** या द बिशप्स को-एड स्कूल, उंड्री येथे कनिष्ठ शाळेच्या मराठी शिक्षिका आहेत. २०११ पासून त्या आपल्या शाळेच्या प्राथमिक विभागात हिंदी आणि मराठी विषय शिकवत आहेत.

**द्वितीय परीक्षक: श्रीमती उर्मिला भालेराव**



**सौ. उर्मिला भालेराव** या द बिशप्स को-एड स्कूल, उंड्री येथे कनिष्ठ शाळेच्या मराठी शिक्षिका आहेत. गेल्या वर्षभरापासून त्या आपल्या शाळेच्या प्राथमिक विभागात मराठी विषय शिकवत आहेत.

स्पर्धा चार विभागांत विभाजित केली होती. प्रत्येक विभागाच्या सुरुवातीला स्पर्धेतील स्पर्धकांची ओळख करून देण्यात आली. उच्चार, स्पष्टता, गद्य व पद्य निवड, सादरीकरण आणि अभिव्यक्ती यांचा समावेश असलेल्या निकषांबद्दल स्पर्धकांना माहिती देण्यात आली. सर्व मुख्य वक्त्यांनी अतिशय स्पष्टपणे सादरीकरण केले. स्पर्धकांचा आत्मविश्वास, अभिव्यक्ती आणि प्रतिभा यामुळे हा कार्यक्रम खरोखरच संस्मरणीय झाला.

स्पर्धकांच्या सादरीकरणाने परीक्षक प्रभावित झाले आणि विद्यार्थ्यांनी स्पर्धेच्या तयारीसाठी घेतलेल्या मेहनतीचे त्यांनी कौतुक केले व त्यांचे अभिनंदन केले.

मुख्याध्यापक श्री. राल्फ रसल यांनी  निकाल जाहीर केला.

निकालाचा क्रम खालीलप्रमाणे होता:

## विजेते

| इयत्ता | उत्कृष्ट वक्ता | सदन |
|---|---|---|
| इयत्ता ६ वी | ऋग्वेद कुंभार | ओ'कॉनर सदन |
| इयत्ता ७ वी | राजसी दळवी | रे सदन |
| इयत्ता ८ वी | श्लोक दरेकर | ओ'कॉनर सदन |
| इयत्ता ९ वी | चैतन्य माने | रे सदन |


## विजेत्या सदनांचा क्रम

| HOUSE | POSITION |
|---|---|
| रे सदन | प्रथम |
| ओ'कॉनर सदन | द्वितीय |
| यंग सदन | तृतीय |
| विंटल सदन | चतुर्थ |

इयत्ता ८ वी मधील साची कांकरिया या विद्यार्थिनीने सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाचा समारोप केला.








आमचे आधारस्तंभ - मुख्याध्यापक श्री. राल्फ रसल सर



मराठी वक्तृत्व स्पर्धेचा आस्वाद घेताना - विद्यालयाचे मुख्याध्यापक व समन्वयिका




गुणसारिणी तयार करण्यासाठी तत्पर शिक्षिका



मराठी विभागाच्या शिक्षिका, संगणक शिक्षिकेसमवेत कार्यमग्न



स्पर्धेचे सूत्रसंचालक



स्पर्धेत सर्वोत्कृष्ट ठरलेले वक्ते





मराठी वक्तृत्व स्पर्धेचे विजेते मान्यवरांसमवेत



सर्व सहभागी विद्यार्थी


CONGRATULATIONS


HOUSE POSITION
1ST POSITION
2ND POSITION
3RD POSITION
4TH POSITION


आभार प्रदर्शन




अहवाल लेखन:



सौ. पल्लवी सचिन खोडके